IIP International Multidisciplinary Research Journal
IIPIMRJ

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 03 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

# महाराष्ट्रातील स्वातंत्र्ययुद्धातील आदिवासी चळवळ

**प्रा. अतुल रामदास पोखरकर**

महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल

**Article Info**

***Article History:***
Received: 24th January 2026
Accepted: 01st February 2026
Published: 05th February 2026

***Keywords:***

*महाराष्ट्र*
*आदिवासी चळवळ*

**ABSTRACT**

आदिवासी म्हणजे या देशातील मूळ निवासी जे आधी पासून येथील जनजाती असून ती जंगलात वास करते त्यामुळे यांना मूलनिवासी अथवा आदिवासी असे संबोधले जाते. काळानुरूप अनेक अभ्यासकांनी, विचारवंतांनी आदिवासी समाजाची व्याख्या केली आहे. परंतु आदिम जमात असे याचे मूळ रूप आहे. प्राचीन काळापासून हा समाज शिक्षणापासून वंचित व मूळ प्रवाह पासून विलग असल्यामुळे त्यांच्या कार्याला किंवा कृतीला लेखनप्रवाहामध्ये मिसळू दिले नाही. तसेच त्यांना इतिहासच नाही अशी धारणा होती. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात समाजातील अनेक घटकांचा उल्लेख केला आहे. परंतु आदिवासी समाजाच्या लढ्याला बंड असा उल्लेखून त्यांचे कार्य सीमित करण्याचा प्रयत्न अभ्यासकांनी व इतिहासकारांनी केला. आदिवासी समाजाने येथील सावकारशाही व ब्रिटीशशासनाविरुद्ध उभारलेल्या सशस्त्र क्रांतिकारी उठावाला कवडी मोल ठरविण्यात इतिहासकार व अभ्यासक चुकले नाही. सुरुवातीपासूनच आदिवासी समाजाला डावलून त्यांना मूळप्रवाहापासून अलिप्त ठेवण्याचे काम केले आहे. त्यामुळे आदिवासी समाजाचे स्वातंत्र्य लढ्यात योगदान अभ्यासणे आवश्यक आहे. १८१८ मध्ये मराठ्यांच्या हातून इंग्रजांनी सत्ता मिळवून महाराष्ट्रात प्रशासक म्हणून ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनी काम पाहू लागली. त्यांनी कायदे सुव्यवस्था निर्माण केली. यामध्ये जंगल कायदे, फौजदारी कायदे, गुन्हेगार जमात कायदा इत्यादी कायद्यांचा उल्लेख येतो. याचा परिणाम येथील सर्वसामान्य वर्गाप्रमाणेच येथील आदिवासी समाजावर झाला. त्यांनी याविरुद्ध बंड केले. अनेक आदिवासी क्रांतिकारक हुतात्मा झाले. परंतु आज ही त्याच्या कार्याची दखल घेतली जात नाही. त्यांचा इतिहास लिखित स्वरुपात नसून तो स्थानिक लोकांनी जात्यावरील ओव्या, पोवाडे, भलरी, गीते व कथा यांच्या माध्यमातून त्यांनी जिवंत ठेवले आहे.

***Plagiarism Check Report:***
Tool Used: Turnitin
Date of Report: February 02, 2026
Similarity Index: 7%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Pokharkar, A. R. (2026).** महाराष्ट्रातील स्वातंत्र्ययुद्धातील आदिवासी चळवळ. *IIP: International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ), 3(1), 782–786.*

**शोधनिबंधाचे उद्दिष्ट :**

१. आदिवासी समाजाचे स्वातंत्र्य युद्धातील योगदान अभ्यासणे.

२. आदिवासीची उठाव करण्यामागे असणारी कारणे समजून घेणे.

३. आदिवासी समाजाचे स्वातंत्र्यपूर्व काळातील परिस्थितीची जाणीव करून घेणे.

**संशोधन पद्धती :**

ऐतिहासिक संशोधन पद्धती, विश्लेषणात्मक संशोधन पद्धती, सर्वेक्षण संशोधन पद्धती या संशोधन पद्धतीचा उपयोग करून हा शोधनिबंध सादर केला आहे.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्यात १९९१ च्या जणगणनेनुसार राज्यातील आदिवासींची लोकसंख्या ७३.१८ लक्ष एवढी आहे. महाराष्ट्रातील लोकसंख्येपैकी ९.२७ टक्के लोकसंख्या आदिवासी आहे. आदिवासी लोकसंख्येच्या बाबतीत महाराष्ट्राचा देशात चौथा क्रमांक लागतो. राज्यातील बहुसंख्ये आदिवासी ठाणे, नाशिक, धुळे, जळगाव, अहमदनगर, पुणे, नांदेड, अमरावती, यवतमाळ, नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, रायगड या जिल्ह्यात केंद्रित आहे. आदिवासी जमातींचा विचार करता, त्यात भिल्ल, महादेव कोळी, गोंड, वारली, कोकणा, कातकरी, ठाकर, गाव्तीत, कोलाम, कोरकू, आंध, मल्हार कोळी, धोडिया, दुबळा, माडिया गोंड, परधान, पारधी ह्या जमातींचा प्रामुख्याने समावेश होतो.[१] या प्रत्येक जमाती जंगलात राहत असली तरी यांच्यामध्ये सांस्कृतिक वैविध्य आहे. यांची कुलदैवत, धार्मिक विधीपरंपरा यामध्ये वेगळेपण दिसून येत असले तरी यांचे आर्थिक स्रोत एकच आहेत. यामुळे यांच्या उठावाची कारणे देखील सारखीच आहेत. या जनजाती महाराष्ट्राच्या विविध कानाकोपऱ्यात राहत असल्यातरी त्यांचे आर्थिक हितसंबंध जंगल व जंगलातून मिळणाऱ्या साधनसंपत्तीवर अबलंबून होते. ब्रिटीशपूर्व काळात जंगलात राहणारा हा समाज अनेक राजवटींच्या जाचांना सहन करत आला आहे. अनेक आदिवासी संस्थाने या काळात अस्तित्वात होती. ही संस्थाने मांडलिक राजे म्हणून इस्लामी राजवटीमध्ये राहत होती शिवाजी महाराजांच्या राजवटीमध्ये हा समाज मूळ प्रवाहमध्ये आला. अनेक वर्षापासून या आदिवासी बांधवांना आर्थिक अडचण सोडविण्यासाठी दरोडे, खून, लुटमार करावी लागे. शिवाजी महाराजांनी यांना सह्याद्रीच्या कुशीत वसणाऱ्या या आदिवासी बांधवांना स्वराज्य रक्षणासाठी सिद्ध केले. स्वराज्याचे तट, बुरुज, गडकोट राखण्यास यांना उभ केले. यामुळे या आदिवासी समाजाने शिवाजी महाराज व मराठा साम्राज्याची सेवा निष्ठेने केली.

ब्रिटीश काळात मात्र किल्ल्यांचे महत्त्व कमी होऊन शहरांना महत्त्व प्राप्त झाले. यामुळे आदिवासी बांधवांची परंपरागत वतनदारी व वेतन पद्धत्ती बंद झाली. परिणामी या आदिवासी बांधवांचे अर्थकारण मंदावले. त्यात ब्रिटीशांचे विविध अन्यायकारी कायदे यामुळे जंगलातील साधनसंपत्तीवरील त्यांचे अधिकार नष्ट झाले. आपल्या मूळ मालकी हक्कांपासून वंचित व्हावे लागल्यामुळे उदरनिर्वाहाचा महत्त्वाचा प्रश्न यांच्या समोर उभा राहिला. परिणामी ब्रिटीश मालावर किंवा कचेरीवर धाडी टाकून, स्थानिक जुलमी सावकारांना लुटून त्यांना आपला प्रपंच करावा लागे. १८१८ ते १९४७ या काळात आदिवासी बांधवांनी इथल्या कंपनी सरकार विरुद्ध व ब्रिटीश साम्राज्याविरुद्ध अनेक लढे दिले आहेत.

**महाराष्ट्रातील आदिवासी समाजाचे उठाव**

**भिल्लांचे उठाव :** इंग्रज-मराठा युद्ध परिस्थितीमुळे मराठा साम्राज्याची पकड ढिली होत गेली. मंदसोर येथील होळकर-इंग्रज तहानुसार सातपुड्याच्या दक्षिणेकडील प्रदेश इंग्रजांना मिळाला यात खानदेश प्रांताचा समावेश होतो.[२] खानदेशातील नंदूरबार, जळगाव आणि धुळे जिल्ह्यात ही जमात मोठ्याप्रमाणात आढळते. याशिवाय नाशिक आणि अहमदनगर या जिल्ह्यात सुद्धा या जमितीचे वास्तव्य आहे.[३] १८१८ मध्ये या प्रदेशावर ब्रिटीश अंमल सुरु झाला. सन १८१९ साली भिल्ल जमातीने सर्व बाजूंनी इंग्रजाविरुद्ध संघर्ष सुरु केला. भिल्लांच्या सततच्या हल्ल्यांनी इंग्रजांना त्रस्त केले होते. यामुळे कॅप्टन ब्रिज याने सातपुडा आणि सातमाळा डोंगर रांगातील भिल्लांवर आपले लक्ष केंद्रित केले. आपल्या इंग्रजी तुकड्या पाठवून त्यांनी या भिल्ल सैनिकांनीची रसद तोडण्याचे काम त्यांनी केले. चिल नाईक, जोंधळ्या नाईक व जाकीऱ्या नाईक यासारखे नेतृत्व भिल्लांना लाभले.

**कोळी उठाव (१८२०–१८४४) :**

कोळी समाज हा पश्चिम महाराष्ट्रातील डोंगराळ भागात वास्तव्यास होता. जमीन महसूल वाढ, सावकारांचे शोषण आणि ब्रिटिश पोलिसांची दडपशाही यामुळे कोळी समाजाने बंड पुकारले. रामजी नाईक आणि उमाजी नाईक हे या उठावाचे प्रमुख नेते होते.[४] कोळी उठावाचे स्वरूप अर्धसशस्त्र होते. कोळी जमातीने किल्ले, सरकारी कार्यालये आणि सावकारांच्या घरांवर हल्ले केले. ब्रिटिशांनी उमाजी नाईक याला पकडून फाशी दिली. तरीही कोळी उठावाने ग्रामीण महाराष्ट्रात ब्रिटिश सत्तेविरुद्ध असंतोषाचे वातावरण निर्माण केले.[५] उमाजी नाईक, रामजी नाईक यांनी या उठावाचे नेतृत्व केले होते.

**रामोशी व कातकरी उठाव :**

रामोशी व कातकरी जमातीनेही ब्रिटिश सत्तेविरुद्ध अनेक लढाया केल्या. त्यांचा मुख्य आक्षेप जमीन जप्ती, कर वाढ आणि पोलिसी अत्याचार होता. उमाजी नाईक या रामोशी नेत्याने पुणे परिसरात ब्रिटिश सत्तेला मोठे आव्हान दिले.[६] कातकरी समाजानेही जंगल कायद्यांविरोधात बंड पुकारले. त्यांच्या उपजीविकेवर गदा आल्यामुळे त्यांनी ब्रिटिश अधिकाऱ्यांवर हल्ले केले. या बंडांचे स्वरूप स्थानिक आणि विखुरलेले होते, परंतु त्यांचा प्रभाव व्यापक होता.[७]

**वारली बंड :**

ठाणे जिल्ह्यात प्रामुख्याने वास्तव्याला असणाऱ्या या जमातीला देखील ब्रिटीशांच्या व सावकारशाहीच्या अमानुष छळाला बळी पडावे लागले. लग्नगडी व वेठी या सारख्या प्रथांमुळे या आदिवासी समाजाला अन्याय सहन करावा लागला. लग्नासाठी सावकाराकडून कर्ज स्वरुपात घेतलेला पैसा परत करण्यासाठी लग्न झालेल्या व्यक्तीला सावकारच्या घरी व शेतात घरगडी म्हणून राबवून घेतले जात होते. इथल्या आदिवासींच्या तत्कालीन शोषण व यातनांचे वर्णन कॉम्रेड गोदावरी परुळेकर यांनी त्यांच्या पुस्तकात लिहिले आहे - "वेठीत काम करणारे स्त्री पुरुष दिवसभर मेहनत करायचे. त्यांनी सकाळी घंटेबरोबर जाऊन दुपारपर्यंत काम करायचे. दुपारी त्यांना एका माणसाला पुरेल एवढा भात ते (मालक) देत. तो भात घेऊन लाकडाच्या उखळीत मुसळानी कांडायचा आणि तांदूळ करायचे. ते शिजवून भात करून, मिठाच्या खड्याबरोबर व पाण्याच्या घोटाबरोबर गिळून, ठरलेल्या वेळी सुट्टी संपली की कामावर हजर व्हायचे. दिवस मावळताना संध्याकाळी कामातून सुट्टी होई. घासभर भाताशिवाय दुसरी मजुरी नाही. सणासुदीचा दिवस नाही की सुट्टीचा दिवस नाही. दुखणेबाने नाही. मुक्या जनावराप्रमाणे रोज सकाळ झाली की कामाला जुंपून घ्यायचे. गोळाभर भात पोटात भरून, कंबर मोडेपर्यंत काम करायचे. रात्र झाली की मरगळून पडायचे.''[८]

**गोंड व कोरकू उठाव :**

महाराष्ट्र व मध्यप्रदेश या भागातील बैतुल या सीमावर्ती भागात ब्रिटीश वन कायद्याविरुद्ध येथील गोंड व कोरकू समाजाने २२ ऑगस्ट १९३० उठाव केला. वनसंपत्तीवर जीवन जगणाऱ्या या आदिवासी बांधवांनी महात्मा गांधीच्या विचारांनी प्रेरित होऊन विष्णू सिंह गोंड व गंजन सिंह कोरकू यांनी आदिवासी तरुणांना एकत्रित केले. बंजारीढाल येथे सत्याग्रह करून जंगलात चारा आणि लाकूड गोळा करून ब्रिटीशांच्या जंगल कायद्यांना विरोध केला. परिणामी ब्रिटीशांच्या गोळीबारात विष्णू सिंह व गंजन सिंह यांना वीर मरण प्राप्त झाले.

**आदिवासी उठावाची कारणे :**

**१. सावकारशाहीकडून शोषण :**

प्राचीन काळापासून भारतात सावकारी व्यवस्था जमीन संपादनात महत्त्वाची भूमिका निभावत आली आहे. परंतु भारतात १४ व्या शतकात सुलतानशाही काळात सावकारी हा व्यवसाय म्हणून पुढे आला. ब्रिटीश आगमनापूर्वी राजकीय स्थिरतेचा अभाव व ग्राम पंचायतीकडे असणारे अधिकार यामुळे सावकारशाही जुलमी अवस्थेत नव्हती. महाराष्ट्रात प्रामुख्याने बनिया वर्ग १७ व्या शतकात व्यापारीकरणामुळे आला. ब्रिटीशांच्या कायद्यांमुळे त्यांना अभय मिळाले. कर्ज स्वरुपात घेतलेली रक्कम ते दुप्पट तिप्पट स्वरुपात वसूल करत असे. अन्यथा तारण ठेवलेली जमीन किंवा घरावर आपला ताबा मिळवत असे. जर १०० रुपयांचे कर्ज घेतले तर कर्जरोख्यांवर ११० रुपयांची नोंद केली जात असे. या रकमेवर वर्षाला कमीत कमी ४३ टक्के आणि जास्तीत जास्त ८३ टक्के इतके प्रचंड व्याज आकारले जाई.[९] यामुळे शेतकरी व आदिवासी बांधव कर्जबाजारी झाले.

आदिवासी बांधव किंवा शेतकरी यांना कोणी वाली नसल्याकारणाने हा अन्याय सहन करण्याशिवाय त्यांच्याकडे पर्याय नसे. ब्रिटीशांच्या न्यायालयीन प्रक्रियेत कर्जदार दोषी ठरत असे. याविरुद्ध अनेक आदिवासी तरुणांनी बंड करून सावकारांची नाके

कापणे, नोंदी वह्या जाळून टाकणे, सावकाराला बंदुकीच्या जीवावर धडा शिकविण्यास सुरुवात केली.

**२. ब्रिटीश कायदे आणि आदिवासी :**

जंगलातील लाकूड फाटा, मध, हिरडा, औषधी वनस्पती करून हा आदिवासी समाज आपली उपजीविका करत आला आहे. मानवच्या प्राथमिक गरजा म्हणजे अन्न, वस्त व निवारा या पूर्ण करण्यासाठी लागणारा पैसा हा उत्पन्न होण्याचा मुख्य स्रोत हा जंगलच आहे. प्रत्यक्ष ब्रिटीश अंमल सुरु झाला आणि ब्रिटिशांनी येथील जंगलात प्रवेश करणे, तेथील वस्तूंचा उपभोग घेणे, जंगलातील वस्तूंची विक्री करणे यावर निर्बंध घातले. आदिवासी समाजाचा रहिवास हा याच जंगलात अगदी पिढ्यांपिढ्या होता त्यांना बेकायदेशीर ठरवला गेले. इंग्रज सरकारने सन १८६५ साली भारतीय फॉरेस्ट ॲक्ट हा कायदा केल्याने जंगलावर सरकारची मक्तेदारी निर्माण झाली.[१०] या समाजाचे वास्तव्य जंगलात असल्यामुळे यांना जंगलात शिकार करून मिळालेले प्राणी, मासे, खेकडे, फळे, रान भाज्या यांचा आहार वापर करावा लागत असे. जंगल कायद्याने त्यांच्या जगण्याचा अधिकारच काढून घेतला म्हणून या समाजाने उठाव केला.

**३. गुन्हेगार जमात कायदा :**

भारतातील अनेक जाती-जमातींनी वसाहतवादी सरकारविरुद्ध उठाव करून त्यांना त्रस्त करून ठेवले होते. या जाती-जमातींवर नियंत्रण मिळविण्यासाठी इंग्रज सरकारने सन १८७१ मध्ये गुन्हेगार जमात कायदा तयार केला.[११] या कायद्यानुसार गुन्हेगार ठरवलेल्या जमातींसाठी गावात किंवा शहरातील पोलीस ठाण्यात एक रजिस्टर ठेव्यात येऊ लागले. यात नाव असलेल्या व्यक्तीने गावच्या पोलीस पाटलाला किंवा पोलीस स्टेशनला रोज रात्री हजेरी लावावी लागत असे. यामुळे फक्त संशय घेऊन देखील अनेकांना गुन्हेगार बनविण्यात येऊ लागले. या जमातींच्या लोकांच्या संचार स्वातंत्र्यावर गदा आणली गेली. एका ने जरी गुन्हा केला तरी संपूर्ण जमात या गुन्ह्याची शिक्षा भोगत असुन यामध्ये संपूर्ण जमात गुन्हेगार ठरत असे. यातून या आदिवासी बांधवाचे उठाव कायमचे मोडून काढणे व पुन्हा उठाव होणार नाही यासाठी प्रयत्न करणे हे धोरण होते.

**४. वतन जप्त केले गेले.**

प्राचीन काळापासून जंगलात वास करणाऱ्या आदिवासी बांधवांनी मध्ययुगात अनेक राजकीय स्थित्यंतरे पहिली होतो. अनेक राजवटींचे मांडलिक म्हणून देखील राहून वतनांचा उपभोग घेतला आहे. शिवाजी महाराजांच्या काळात त्यांना माहिती असणाऱ्या भौगोलिक घटकांची माहिती व काटक शरीरयष्टी याचा विचार करता सह्याद्रीच्या खोऱ्यात वास करणाऱ्या आदिवासी बांधवांना सेवेत घेतले. पेशवाई काळात वतन म्हणून त्यांना जमिनी मिळाल्या. ब्रिटीश काळात त्यांची वतने काढून घेण्यात आली. तात्पुरते स्वरुपात डोंगराळ भागात काम करण्यासाठी या आदिवासी जमातींची ब्रिटीश सैन्यात भरती करून त्यांच्या तुकड्या निर्माण करून तात्पुरत्या स्वरुपात रोष कमी करण्याचा प्रयत्न केला. परंतु गरज संपल्यावर त्यांना सेवेतून पायउतार केले. परिणामी आर्थिक अडचण निर्माण झाली.

**५. ब्रिटीशांचे महसुली धोरण :**

भारतात ब्रिटीशांनी महसूल धोरणात प्रंचड बदल केला होता. ब्रिटीशपूर्व काळात जमीन महसूल जमा करताना तो धान्य स्वरुपात जमा केला जात असे. परंतु ब्रिटिश कंपनी ने हा महसूल नगद स्वरुपात म्हणजेच पैशाच्या स्वरुपात भरावा लागे. रयतवारी ही महसूल पद्धत एलफिस्टन याने मुंबई प्रांतात लागू केली. यामुळे शेतकरी हा जमिनीचा मालक असे. त्यामुळे महसूल भरताना शेतकरी प्रत्यक्ष सरकारला महसूल जमा करत असे. नैसर्गिक आपत्तीमध्ये उत्पादन कमी झाले तरी शेतसारा कमी होता नसे. यामुळे आदिवासी महादेव कोळी समाज शेतसारा भरण्यासाठी सावकाराकडून कर्ज घेत असे. सावकार कर्ज देताना अशिक्षित शेतकऱ्याची कोऱ्या कागदावर शही घेत असे यामुळे कर्ज परतफेड करताना अधिक व्याज द्यावे लाग असे परिणामी कर्ज फेड करणे शक्य न झाल्याने सावकार त्यांची मालमत्ता जप्त करत असे.

**निष्कर्ष :**

आदिवासी समाज हा जरी साक्षर नसला तरी भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. भारतात ब्रिटिशांनी आपली राजवट विस्तारली याचा परिणाम या समाजावर देखील झाला. ब्रिटिशांनी भारतीयांची आर्थिक नाकेबंदी करण्याचे प्रयत्न केला. भारतातील व्यापार युरोपच्या दिशेने वळवून व्यापारातून अमाप फायदा मिळवला. समृद्ध आणि संपन्न म्हणून

ओळखली जाणारी स्थानिक स्वावलंबी अर्थव्यवस्था चिरडून त्यांनी स्थानिकांना बंड करण्यास प्रवृत्त केले. याला आदिवासी वर्ग जो जंगलात राहत होता तो देखील अपवाद राहिला नाही. सर्वसामान्य गावं, लोकवस्त्या सोडून ते जंगलात राहत होते. आपली संस्कृती व रूढी परंपरा जोपासत गुण्यागोविंदाने राहणारा हा समाज जरी रानटी वाटत असला तरी आक्रमक वृत्तीच्या नव्हता. जंगलातील पशुपक्षी व वृक्षांना देव मानून पूजा करणारा हा समाज निसर्ग संपन्न जीवन जगत होता. परंतु ब्रिटीशांची वक्रदृष्टी पडली आणि या समाजाला ग्रहण लागले. यांनी ब्रिटीश कंपनी व सावकारशाही विरुद्ध बंड केले. फक्त त्यांच्या लढ्याची नोंद इतिहासकरांनी घेतली नाही म्हणून त्यांचे योगदान अलिप्त राहिले. परंतु स्थानिक लोकांनी त्यांचे महत्त्व कमी होऊ दिले नाही.त्यांनी या शूर वीरांचा वारसा आपल्या बोलीभाषेत गाण्यांमधून, जात्यावरील ओव्या, पाळणा गीते, भलरी यामधून जिवंत ठेवली असून त्याचे संक्रमण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे होते आहे.

**संदर्भ :**


१. गोविंद गारे (२०२४), महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, मिहाना पब्लिकेशन, पुणे, पृ. ११.
२. Gazetteer of Bombay presidency (1880), khandesh volume 12, p. 54
३. Grierson G.A (1909), Linguistic Survey of India, Volume 9, Part 3, Calcutta, p 1.
४. देशमुख, वि. ब. (१९७२), कोळी उठाव, राजहंस प्रकाशन, पुणे, पृ. ४१.
५. कुलकर्णी, अ. रा. (२००४), ब्रिटिश काळातील महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे, पृ ११९.
६. पाटील, स. न.(१९८०), उमाजी नाईक आणि रामोशी उठाव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पृ. ६३.
७. डॉ. जाधव, स. र.(२००१), आदिवासी उठाव आणि ब्रिटिश राजवट, नालंदा प्रकाशन, औरंगाबाद, पृ. १०२.
८. https://indiejournal.in/article/historic-warli-revolt-turns-seventy-today-writes-shridhar-pawar Date: 18 Jan 2026.
९. Gazetteer of the Bombay presidency (1884), Ahemadnagar, volume 1, p. 300.
१०. Wilson John (1876), Aboriginal Tribe of the Bombay, Government Central Press, Bombay, p 20-21.
११. विलास दुंदा गोवारी (२०२३), वसाहतिक महाराष्ट्रातील आदिवासींचे उठाव, हरिती पब्लिकेशन, पृ. ४४.